महाराष्ट्र शासन
राज्य सामाईक प्रवेश परीक्षा कक्ष

८वा मजला, न्यु. एक्सलसियर
बिल्डींग, ए.के. नायक मार्ग,
फोर्ट, मुंबई - ४०० ००१

दूरध्वनी : ०२२ - २२०१ ६१५९
वेबसाईट : http://www.mahacet.org
ईमेल : maharashtra.cetcell@gmail.com

क्र.तंशिप्र-१२१९/प्र.क.१९९/जाहिर सुचना-५/२०१९/१७३५ दिनांक-२०/०६/२०१९.

# जाहिर सूचना

शैक्षणिक वर्ष २०१९-२० साठी राज्य सामाईक प्रवेश परीक्षा कक्ष, मुंबई यांच्यावतीने **SAAR** पोर्टलवर जनरल रजिस्ट्रेशन व सीईटी पोर्टलवर प्रथम वर्ष पदवी अभियांत्रिकी, औषधनिर्माणशास्त्र, वास्तुशास्त्र, हॉटेल व्यवस्थापन अभ्यासक्रमांच्या केंद्रीभूत प्रवेश प्रक्रियेचे (CAP) काम सुरु करण्यात आलेले होते.

सदर प्रवेश प्रक्रियेसाठी विद्यार्थ्यी/ पालक यांच्या माहितीस्तव कार्यसूची वेळापत्रक (Activity Schedule) राज्य सामाईक प्रवेश परीक्षा कक्षाच्या अधिकृत संकेतस्थळावर प्रसिध्द करण्यात आले होते. त्याअनुषंगाने विद्यार्थ्यांनी **SAAR** पोर्टलवर जनरल रजिस्ट्रेशन व सीईटी पोर्टलवर केंद्रीभूत प्रवेश प्रक्रियेचे अर्ज ऑनलाईन पध्दतीने भरण्याची सुविधा उपलब्ध करुन देण्यात आलेली होती.

सदर प्रक्रियेसाठी नमूद केलेल्या विहित कालावधीत विद्यार्थ्यांनी एकाच वेळी सर्व व्यवसायिक अभ्यासक्रमाच्या प्रवेश प्रक्रियेसाठी ऑनलाईन नोंदणी व त्याअनुषंगाने प्रवेश प्रक्रिया अर्ज भरण्यास सुरुवात केल्यामुळे सर्व्हरवरील भार मोठयाप्रमाणत वाढल्याने प्रथम वर्ष पदवी अभियांत्रिकी, औषधनिर्माणशास्त्र, वास्तुशास्त्र, हॉटेल व्यवस्थापन अभ्यासक्रमाच्या ऑनलाईन प्रवेश अर्जाची प्रक्रिया संथगतिने सुरु असल्याबद्दल विद्यार्थ्यी/ पालक यांच्याकडून तक्रारी प्राप्त झाल्या होत्या.

सदर प्रक्रिये दरम्यान विद्यार्थ्यांनी भरलेली माहिती एकत्रितपणे संलंग्नित करताना तांत्रिक अडचणी निर्माण झाल्या होत्या, असे उमेदवारांनी भरलेल्या अर्जाच्या प्रती मुद्रीत केल्यावर त्यांच्या लक्षात आल्याच्या तक्रारी सीईटी कक्षास प्राप्त झाल्या.

अशा सदोष माहितीच्या आधारे अंतरिम गुणवत्ता यादी प्रसिध्द करणे धोकादायक असल्याचे प्राधिकरणाने नेमलेल्या तज्ञ समितीने मत व्यक्त केले. त्याअनुषंगाने चालु असलेली ऑनलाईन अर्ज

भरण्याची, भरलेल्या अर्जाची व अपलोड केलेल्या दस्ताऐवजांची सेतू सुविधा केंद्रावर पडताळणी करण्याची प्रक्रिया संस्थगित करुन नव्याने सदर प्रक्रिया राबविण्याचा निर्णय प्रवेश नियामक प्राधिकरणाने घेतलेला आहे.

सर्व विद्यार्थी/ पालक यांना आश्वासित करण्यात येते की, नव्याने अर्ज भरण्याची प्रक्रिया सोमवार दिनांक २४/०६/२०१९ दरम्यान सुरु करण्यात येईल. त्यासंबंधीचे सुधारीत वेळापत्रक लवकरच प्रसिध्द करण्याचा राज्य सामाईक प्रवेश परीक्षा कक्षाचा मानस आहे. तसेच ज्या विद्यार्थ्यांनी पूर्वी प्रवेश प्रक्रियेसाठी अर्ज भरलेला आहे अशा सर्वांना पुन्हा नव्याने प्रवेश प्रक्रियेचा अर्ज सादर करावा लागेल. नव्या अर्ज प्रक्रियेत यापूर्वी अर्ज सादर केलेल्या व अर्जा सोबत शुल्क भरलेल्या विद्यार्थ्यांचे हित रक्षण करण्याचा पुर्ण प्रयत्न करण्यात येईल.

**सही/-**
**आयुक्त तथा सक्षम प्राधिकारी,**
**राज्य सामईक प्रवेश परीक्षा कक्ष,**
**महाराष्ट्र राज्य, मुंबई**